महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

Website-https://mahaawaas.org
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९ Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./SMURH/IT/मोहिम/२०२३/१७३२ दि: २७/१०/२०२३

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व).

**विषयः- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी दि.०६/११/२०२३ ते दि.१०/११/2023 या कालावधीत राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शानाखाली मोहिम राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेकरीता जिल्हा प्रोग्रॅमर यांना त्यांच्या विभागात खालील ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी आपल्या स्तरावरुन सूचित करावे. तसेच सदर मोहिमेस कोणताही जिल्हा प्रोग्रॅमर अनुपस्थित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | विभाग | ठिकाण | राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांचे नाव व संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | पुणे व कोंकण | पुणे | श्री.संघपाल चव्हाण - ९७७३२९९७६३ |
| २ | नाशिक | जळगाव | श्री.मायकल एल्डन - ९९२०४३४२०९<br>श्री.योगेश पाटील - ८६८९८८३५३० |
| ३ | छत्रपती संभाजी नगर | धाराशिव | श्री. राम आघाव - ८४०१३६३७९२ |
| ४ | अमरावती व नागपूर | नागपूर | श्रीम. राजलक्ष्मी येरपूडे - ८२९११८४२११<br>डॉ.संघरत्न सोनवणे - ७९७२०९३७१२ |

**सदर मोहिमे अंतर्गत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल-**

१. जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, ते फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केलेले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केलेले नाहीत, अशी घरकुले online पूर्ण करुन घेणे.
२. Plinth व Lintel Level वरील घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल Physically पूर्ण करणे.
३. Delayed Houses मधील घरकुले पूर्ण करणे.
४. आधार सिडींग व आधार Authentication पूर्ण करणे.

सदरील कालावधीत ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी यांना, त्यांना ठरवून दिलेल्या आपल्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहणेबाबत व आपले अधिनस्त प्रकल्प संचालक यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत आपले स्तरावरून सूचित करावे.

तसेच जिल्हा प्रोग्रॅमर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना दैनिक भत्ता व वाहन भत्ता अनुज्ञेय राहिल.

**(डॉ. राजाराम दिघे)**
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत:**

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
५. विभागीय प्रोग्रॅमर, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना मोहिमेस उपस्थित राहण्यासाठी.